**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

# 'स्वच्छ भारत - स्वस्थ भारत' अभियानांतर्गत जिल्हास्तरीय उत्कृष्ट पुरस्कार घोषित
# ५ ऑगस्टला होणार प्रदान

अमरावती.

भारताचे माननीय पंतप्रधान व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांनी 'स्वच्छ भारत - स्वस्थ भारत' अभियानांतर्गत केलेल्या आवाहनानुसार 'स्वच्छ भारत - स्वस्थ भारत अभियान' ही योजना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयीन परिसर व दत्तक ग्राम इत्यादी भागात महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक, परिसरातील नागरिक यांच्या सहकार्याने व्यापक जनजागृती ठेवून करण्यात आली.

त्यामध्ये उत्कृष्ट महाविद्यालयांची जिल्हानिहाय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे, त्यामध्ये अमरावती जिल्ह्यांतर्गत जे.डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय, दर्यापूर आणि प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट, बडनेरा, अमरावती, अकोला जिल्ह्यांतर्गत श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला आणि श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला, बुलढाणा जिल्ह्यांतर्गत श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देऊळगांव राजा, बुलढाणा आणि सहकार महर्षि स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, खामगांव, बुलढाणा, यवतमाळ जिल्ह्यांतर्गत आबासाहेब पारवेकर कला, वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ, वाशिम जिल्ह्यांतर्गत श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा लाड, वाशिम आणि मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम यांची निवड करण्यात आली आहे. याशिवाय विद्यापीठस्तरीय पुरस्कार श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा लाड, वाशिम या महाविद्यालयाला प्रदान होणार आहे.

दिनांक ५ ऑगस्ट, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता डॉ.के.जी. देशमुख सभागृहात रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी सत्रारंभ सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सभेच्या अनुषंगाने सत्र २०१८-१९ मध्ये विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट ठरलेल्या एकक, कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक यांना तसेच स्वच्छ भारत - स्वस्थ भारत अभियानांतर्गत उत्कृष्ट ठरलेल्या एककांना मान्यवरांचे हस्ते पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येणार आहे. तरी सर्व संबंधितांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाच्यावतीने रा.से.यो. प्रभारी संचालक डॉ. राजेश बुरंगे यांनी केले आहे.

---

प्रति,	**जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी	दि. ०२/०८/२०१९.
दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी